आर.सी.सी.क्रं.३८१/२०१९
नि. क्रमांक ११.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-
माझे नाव :- पंजाब विठ्ठलराव शिंदे,
वय सुमारे :- ६० वर्षे, व्यवसाय :- चालक,
निवासस्थान :- ताथवडे, ता. मावळ, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत</u>**

सन २०१७ मध्ये मी ताथवडे येथील खंबाटे कॉलनीमध्ये राहत होतो. माझ्यासोबत माझी दोन मुले गणेश व मनिष असे राहत होतो. दि. ०७/०९/२०१७ रोजी काय घटना घडली होती हे मला आठवत नाही. दि. ०७/०९/२०१७ रोजी माझा मुलगा गणेश मुंबई येथे गेला होता. माझा मुलगा मुंबईहून परत न आल्यामुळे मी त्यास फोन करत होतो परंतू त्याचा फोन लागत नव्हता. माझा मुलगा गणेश एम आय डी सी येथून प्रवाशी घेऊन मुंबई येथे गेला होता. दुस-या दिवशी मी शाळेमध्ये कामास गेलो होतो. सकाळी ७.३० वा च्या सुमारास मला स्पर्श हॉस्पीटल येथून फोन आला होता. मी स्पर्श हॉस्पीटल येथे जाऊन पाहिले असता माझा मुलगा आय सी यु मध्ये भरती होता व बोलण्याच्या परिस्थीतीमध्ये नव्हता.

०२. माझा मुलगा शुध्दीमध्ये आल्यावर त्याने मला सांगितले की, तो मुंबईवरुन पुण्याकडे येत असतांना स्वीफ्ट डिझयर गाडीचा एक्सेल तुटल्यामुळे तो रस्त्यावर तिस-या लेनमध्ये आला होता त्यामुळे त्याची गाडी दुस-या गाडीस ठोकली होती. माझ्या मुलाची गाडी आरोपींची गाडी स्वीफ्ट डिझायर हिस ठोकल्यामुळे आरोपींनी माझ्या मुलास मारहाण केली होती हे मला माहित नाही.

**<u>साक्षीदार सहकार्य करत नसल्याने भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सरकारी विधीज्ञ यांना साक्षीदारास सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.</u>**

०३. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताच्या कारणावरुन आरोपींनी माझ्या मुलास गंभीर मारहाण केली होती. माझ्या मुलास मारहाण करणा-या आरोपींची नावे अमीर शेख, सागर ओव्हाळ, नवनाथ लोखंडे, सुजित भालेराव, स्वप्नील ओव्हाळ असे असल्याचे मला माहित नाही. पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत तपास केला होता. पोलीसांनी माझ्या जबाबातील मजकूर का नमूद केला याचे कारण मी सांगू शकत नाही.

०४. मी आरोपींना ओळखू शकत नाही. माझ्या मुलाचे अटयाकचे दोन ऑपरेशन झालेले आहेत व तो पलंगावरच पडून आहे. तो चालू फिरु शकत नाही.

**<u>सरकारी वकीलांमार्फत उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकिल श्री. तनवीर जहागीरदार यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

०५. हे म्हणणे खरे आहे की, माझी आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला व माझ्या मुलाला आरोपींविरुध्द केस चालवायची नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा कोर्टामध्ये येण्यास असमर्थ आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/xxx
**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**

**दिनांक. ०६/०८/२०२६.**